
# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय पहिला

## सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

ई-साहित्य प्रतिष्ठान®

# भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

## अध्याय पहिला

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)


२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

## श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com



ई प्रकाशन :

## ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

**E** Sahity Pratishthan

**E**leventh floor(G1102)

**E**ternity

**E**astern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख



©श्री विजय पांढरे(२०१२)



**या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.**



प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भॆट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

|| ॐ परमात्मने नमः ||

## अध्याय पहिला

# अर्जुनविषादयोग

जय जय श्री आत्मरूपा । करावी मजवरी कृपा । तू स्वंयेचि जाणीवस्वरूपा । भगवंता माझ्या ||१||
देवा तूचि गणेशु । तूचि सकलमति प्रकाशु । म्हणे हा निवृत्तिदासु । ज्ञानेश्वर ||२||
प्रकटो ब्रह्म शब्द होऊन । शब्दस्वरूप ते घेऊन । कर तुझेच तू वर्णन । भगवंता आता ||३||
प्रकटली स्मृति शब्द लेवून । काव्यपंक्ति त्या होऊन । तू गूढार्थ तो घेऊन । प्रकट आता ||४||
अठरा पुराणे तेच अलंकार । लेवून नाना शब्दप्रकार । घेऊन अर्थ अपार । प्रकटावे देवा ||५||
होऊ दे काव्य सुंदर । जसे रंगीत ते अंबर । शब्द बनून पल्लेदार । प्रकटो आता ||६||
बनून ओवी काव्यप्रकार । करण्या कौतुक चिरंतनाचे अपार । गूढार्थाची ती घुंगर । वाजो देवा ||७||
रहस्य जे अस्तित्वाचे । तत्त्व ते बुद्धीपलीकडचे । वर्णन त्या परमपदाचे । होवो देवा ||८||
तव कटी मेखला मिरवती । तीच व्यासादिकांची मती । पदरसोगे ते झळकती । मुक्तपणे ||९||
दर्शने सहा असती । म्हणून सहा भुजांची मूर्ती । परस्पर विसंवाद करती । आयुधे प्रतीकात्मक ||१०||
तर्कशास्त्र ते परशू । न्यायशास्त्र तो अंकुशु । वेदांत तो महारसु । मोदक मिरवे ||११||
एके हाती असे दात । जे संकेतात्मक बौद्धमत । जे स्वभावतः असे खंडित । वार्तिक म्हणती ||१२||
हाती फूल कमळाचे । जे प्रतीक चिरंतन सत्तेचे । कार्य धर्मस्थापनेचे । म्हणून अभयहस्त ||१३||
बघ विवेकवान केवळ । म्हणून सोंड सरळ । ते परमानंदाचे बळ । आत्मतत्त्वी ||१४||
दात प्रतीक समतेचे । जे अति शुभ्रवर्णाचे । नेत्र प्रतीक ज्ञानाचे । पहा तवठायी ||१५||
पूर्व उत्तर मीमांसा दोन । तसे प्रतीकात्मक कान । करती मुनी बोधाचे सेवन । भ्रमर होऊनि ||१६||
आत्मबोधपूर्ण ती मती । म्हणून चमकती ते मोती । दोन गंडस्थळे जी असती । ती द्वैत अद्वैत ||१७||
दहा उपनिषदे फुले खास । आत्मज्ञानाचा तया सुवास । शोभा येई गंडस्थळास । फुलाकारणे ||१८||
पाय ते अकार । उदर ते उकार । मस्तक ते मकार । भले मोठे ||१९||
ओंकाराचा जो सार । प्रकटवून ब्रह्मज्ञान अपार । केली कृपा मजवर । भगवंता तू ||२०||
आता करतो सरस्वती नमन । मग होईल तुझे ते वर्णन । मग गूढार्थाचे ते प्रकटन । आपोआप ||२१||
मज हृदयी प्रकटविले सार । म्हणून तरलो हा संसार । कृपा अपार माझ्यावर । भगवंता तुझी ||२२||
आत्मज्ञानाचे अंजन घालता । मिटते भ्रम अज्ञानता । मग अनुभवा येते ब्रह्ममयता । ठायी ठायी ||२३||
होता चिंतामणी तो प्राप्त । मग कशाची ददात । सर्व इच्छांची वासलात । लागली आता ||२४||
म्हणून होण्या ते ज्ञान । जावे सद्गुरूला शरण । जैसे घडता मुळास सिंचन । तरतरे वृक्ष ||२५||
केल्याने समुद्रात स्नान । घडे सर्व तीर्थांचं पुण्य । होतसे सर्व रसांचं चाखणं । सेवता अमृत ||२६||
म्हणून होण्या सर्व आशा पूर्ण । करतो श्री गुरूसी वंदन । वारंवार माझे नमन । त्यांचे पायी ||२७||
आता ऐका कथा गहन । जी सर्व सुखाचे उगमस्थान । अतिसुंदर ते उपवन । ज्ञानाचे ||२८||
करता गीतेचे अध्ययन । होतसे सुखाचे प्रकटन । संपणे भ्रम अज्ञान । सूत्र असे ||२९||
जाणण्या शास्त्रांचे हे सार । करण्या भवचक्र ते पार । सर्वांनी व्हावे तयार । मनोभावे ||३०||



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ई साहित्य प्रतिष्ठान

गीता सर्व धर्मांचे माहेर । प्रकटले ज्ञान ते अपार । मोक्षाचे सूत्र मनोहर । गीतेमाजी ॥३१॥
गीता कथा ती सुंदर । प्रकटली रणभूमीवर । करण्या जगाचा उद्धार । कुरुक्षेत्री ॥३२॥
गीता काव्य अतिखास । सूत्र एकाहून एक सरस । आत्मतत्त्वाचा सुवास । गीतेमाजी ॥३३॥
अजून ऐका गोष्ट एक । गीता परमज्ञान सात्त्विक । आत्मतत्त्वाची घडे ओळख । गीते कारणे ॥३४॥
संपता भ्रम अज्ञान । होतसे बोधाचे प्रकटन । संपतसे ते जन्ममरण । ज्ञान होता ॥३५॥
ज्ञान ते प्राप्त होता । प्रकटते जगण्यातील सहजता । आयुष्यातील विषण्णता । निघून जाई ॥३६॥
कलेसी येते कौशल्यता । पुण्य ते वाढता । घडली जनमेजयासी मुक्तता । श्रवणामाजी ॥३७॥
विचार जर केला क्षणभर । रंगांना येतसे बहर । सद्‌गुण होती ते प्रखर । श्रवण घडता ॥३८॥
जसे सूर्यबिंबच प्रकटले । त्रैलोक्य पहा उजळले । तैसे व्यासांनी प्रकटविले । गीता तत्त्व ॥३९॥
सुपीक जमिनीत बी पेरता । प्रकटते ती धनधान्यता । तैसे फुलली ही गीता । रणांगणी ॥४०॥
शहरात निवास करता । वाढते ती सभ्यता । तैसे गीता तत्त्व ऐकता । ज्ञान होते ॥४१॥
येता ती तारुण्यता । प्रकटे मग लावण्यता । मग आगळीच सुंदरता । तरुणीठायी ॥४२॥
आधीच रमणीय उद्यान । त्यात वसंताचे आगमन । मग सुंदरतेचे प्रकटन । सर्वदूर ॥४३॥
गोळा तो सोन्याचा । ना गुण ना आकाराचा । आकार देता अलंकाराचा । भासे सुंदर ॥४४॥
तैसे व्यासांनी जे वर्णिले । जर ते मनापासून ऐकले । मग मुक्तीचे दारच उघडले । आपोआप ॥४५॥
प्रतिष्ठा ती इच्छून । अंगी लहानपण घेऊन । प्रकटली सर्व ती पुराणं । महाभारती ॥४६॥
जे नाही महाभारतात । ते नसे तिन्ही लोकांत । म्हणून गीता श्रेष्ठ जगतात । जाणकार तुम्ही ॥४७॥
ऐसी ही गीता सुरस । प्राप्त होण्या मोक्षास । वैशंपायन मुनींनी जनमेजयास । सांगितली असे ॥४८॥
ऐसी कथा ती उत्तम । पवित्र आणि निरूपम । प्राप्त होण्या मोक्षधाम । ऐकावी तुम्ही ॥४९॥
गीता अध्यात्माचे सार । होण्या भवचक्रापार । भगवंताचे अनंत उपकार । आम्हावरी ॥५०॥
ज्ञानसागर तो मंथुनी । व्यासमुनींनी काढले लोणी । प्रकटली मोक्षाची ती कहाणी । गीतेठायी ॥५१॥
लोणी ज्ञानाग्नित तापवून । विवेक वैराग्य कथून । कथिले स्वानुभवाचे आत्मज्ञान । आम्हासाठी ॥५२॥
घडता ती संतसंगती । येते बा ती विरक्ती । प्रकटते मग ती मुक्ती । बोध होता ॥५३॥
श्री व्यासांचे हे कथन । उपयोगी होण्या आत्मज्ञान । होतसे मानवाचे कल्याण । गीता ऐकता ॥५४॥
ही गीता जी म्हणीतली । ती शिव-ब्रह्माने प्रशंसीली । सनकादिकांनी असे सेविली । आदराने ॥५५॥
पडता शरदाचं चांदण । टिपती चकोर अमृतकण । तसे देऊन पूर्ण अवधान । ऐकावे तुम्ही ॥५६॥
मन एकाग्र करून । चित्ती सावधान होऊन । घडो गीतेचे ते श्रवण । अंतरंगी ॥५७॥
शब्दांच्या पलीकडे जाता । मनइंद्रियासी तादात्म्य तुटता । प्रकटते ती आत्मसत्ता । आपोआप ॥५८॥
जैसे भ्रमर नेती परागकण । दुर्लक्षून कमलदलाची पान । तैसे करावे तुम्ही श्रवण । या ग्रंथाचे ॥५९॥
जैसे गगनी चंद्र प्रकटता । आपले स्थान न सोडता । देतसे चंद्रासी अलिंगनता । ती कुमुदिनी ॥६०॥
ऐसे जयाचे गंभीर मन । स्थिर जयाचे अंतकरण । तया होतसे आत्मज्ञान । श्रवण करता ॥६१॥
जे अर्जुनासम योग्य असती । तया होतसे ज्ञान प्राप्ती । येता आत्मतत्त्वाची प्रचीती । मोक्ष घडे ॥६२॥
सज्जनहो तुम्ही उदार । म्हणून काढतसे उद्‌गार । ठेवतो माथा चरणावर । तुमच्या येथे ॥६३॥
जैसा स्वभाव मायबापाचा । लेकरू बोले बोबडी वाचा । तरी वर्षाव कौतुकाचा । लेकरावर ॥६४॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

तैसे अंगीकारा मजला । समजून बा आपला । कमी अधिक जरी फुटला । बोल मुखी ॥६५॥
परि अपराध आणिक आहे । मी आत्मतत्त्व चावळू पाहे । मुठीत मी धरू पाहे । अनंत आकाशा ॥६६॥
अतर्क्यच माझे हे धाडस । हाती घेणे ऐसे साहस । काजवा का देऊ शके प्रकाश । सूर्यालागी ॥६७॥
टिटवी आपल्या चोचीनं । घेऊ पाहे सागरास शोषून । तैसा माझा हा प्रयत्न । जाणतो मी ॥६८॥
आकाशास ते कवटाळणे । त्यासाठी त्याहूनही मोठे होणे । तैसे गीतार्थ सांगणे । अतिकठीण ॥६९॥
या गीतार्थाचे विवरण । केले पहा शिवशंकरानं । पार्वतीनं केला होता प्रश्न । मोक्षासाठी ॥७०॥
शिव म्हणे न उमजे । देवी जैसे का स्वरूप तुझे । तैसे नित्यनूतन देखीजे । हे गीतातत्त्व ॥७१॥
या गीतार्थाचे वर्णन । केले त्या परमेश्वरानं । घडणे स्वप्न-सुषुप्तीत जागरण । सूत्र असे ॥७२॥
ऐसे हे तत्त्व अगाध । जेथे वेडावले ते वेद । तेथे मी मतिमंद । काय बोलू ॥७३॥
अनंता कैसे जाणावे । महातेजा कसे उजळावे । चिलटाने आकाशा कसे घ्यावे । मुठीमाजी ॥७४॥
परि येथ मज एक आधार । मज मनी प्रकटला सारंगधर । तयाचाच हा चमत्कार । बोल माझे ॥७५॥
ऐरवी मी अज्ञानी । सत्य असत्य न जाणी । प्रकटली जी ही वाणी । ती त्याचीच कृपा ॥७६॥
लोखंडाचे सोने होणे । ते परिसाच्याच स्पर्शाने । मेलेलाही जिवंत होणे । ते अमृत ॥७७॥
प्रसन्न होता सरस्वती । मग बोल स्वयेचि उमलती । मुकेही बोलू लागती । ज्ञान होता ॥७८॥
जयाची कामधेनू माता । तया सर्व गोष्टींची प्राप्यता । म्हणून गीतार्थाची वाच्यता । करतसे आज ॥७९॥
सज्जनहो तुम्हा माझे विनवणे । जरी बोललो अधिक उणे । तरी माझे ते बोलणे । दुर्लक्षा तुम्ही ॥८०॥
आता द्यावे अवधान । तुम्ही बोलविल्या मी बोलेन । जशी सूत्रधाराच्या अधीन । कळसूत्री बाहुली ॥८१॥
मी संतांच्याच अधीन । संतांचाच निरोप सांगीन । मज पदरात ते घेऊन । करावे पवित्र ॥८२॥
मग श्री गुरू म्हणती । न बोलावे आता अति । गीतेची ती महती । सांगावी आता ॥८३॥
ऐकता त्या बोलास । मनी प्रकटला परम उल्हास । म्हणे एकाग्र करून मनास । ऐकावे आता ॥८४॥
पुत्रप्रेमाने होऊन मोहित । धृतराष्ट्र असे विचारत । रणांगणावरची खबरबात । सांग संजया ॥८५॥
जे प्रसिद्ध धर्मक्षेत्र म्हणून । तेथे कौरव पांडव जमून । युद्धाच्या त्या निमित्तानं । काय करती ॥८६॥
आता या क्षणी । काय करती ते रणी । सांग मज पाहुनी । त्वरित आता ॥८७॥
त्या वेळी संजय तो बोलला । पाहुनी पांडव सैन्याला । म्हणे महाप्रलयच प्रकटला । रणी आता ॥८८॥
आले असे घनदाट । पहा अचाट ते संकट । प्रकटले जसे काळकूट । अमृतमंथनी ॥८९॥
समुद्री अग्नी भडकतो । मग वावटळीसम पसरतो । सागराही तो शोषतो । भिडून आकाशा ॥९०॥
तैसे पांडव सैन्य अफाट । व्यूव्हरचना ती अचाट । सारा मृत्यूचाच थाट । प्रकटला रणी ॥९१॥
हत्तीचा कळप मदोन्मत्त । सिंह असे दुर्लक्षित । तसा पांडवा असे अव्हेरीत । दुर्योधन तेथे ॥९२॥
मग द्रोणापाशी येऊन । बोलता झाला तो दुर्योधन । पहा गुरुदेव हे योद्धेजन । पांडवांचे ॥९३॥
जैसे डोंगरी किल्ले असती । तैसे व्यूव्हरचना सभोवती । द्रुपदपुत्राची ही मती । गुरुदेवा ॥९४॥
जयास तुम्ही शिकवले । तयानेच हे व्यूव्ह लावले । पहा सैन्य कसे उभारले । सभोवती याने ॥९५॥
मी असे शत्रूस पहात । जे युद्धात अति पारंगत । शस्त्रे घेऊन ती हातात । सज्ज रणी ॥९६॥
योद्धे एकाहून एक महान । भीम अर्जुनासमान । युद्धी असती जे निपुण । जमले येथे ॥९७॥
आहे येथे युयुधान सुभट । आला असे तो विराट । आणि महारथी तो श्रेष्ठ । द्रुपदवीर ॥९८॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

धृष्टकेतु आणि चेकितान । काशीराज वीर बलवान । शैब्य उत्तमौजा समान । वीर जमले ॥९९॥
पहा कुंतीभोजास । युधामन्युही आला युद्धास । पाहिले का पुरुजित राजास । रणांगणी तुम्ही ॥१००॥
तो पहा सुभद्रेचा नंदन । जो असे प्रतिअर्जुन । बोलला तो दुर्योधन । द्रोणामाजी ॥१०१॥
आणिकही द्रौपदीकुमार । जे सगळेच महारथी वीर । हिंमत जयांची अपार । जमले येथे ॥१०२॥
आता माझ्या या सैन्यात । जे असती युद्ध पारंगत । तयांची नावे मी असे सांगत । ऐका आता ॥१०३॥
सांगतो नावे एकदोन । केवळ उदाहरण म्हणून । तुम्हा सारखे जे महान । ऐका आता ॥१०४॥
पहा भीष्म जे गंगानंदन । तेजस्वी सूर्यासमान । शत्रूचा काळ जो कर्ण । आहे येथे ॥१०५॥
जर यांच्या मनी येईल । तर विश्वही संहारतील । पांडवा सहज मारतील । कृपाचार्य ॥१०६॥
येथे विकर्णही आला । पाहून घ्या अश्वत्थाम्याला । जयाची भीती वाटतसे काळाला । सदोदित ॥१०७॥
समितिंजय सौमदत्ती । ऐसे कित्येक बहू असती । नाही जयांच्या बळाची गणती । ब्रह्मदेवा ॥१०८॥
सर्व शास्त्र पारंगत । जमले सिद्धमंत्र अवगत । अस्त्रे आली प्रचारात । ज्यांचे कारणे ॥१०९॥
जे असती अतिशक्तिमान । युद्धसज्ज ते होऊन । मजसाठी करण्या प्रार्णापण । आले येथे ॥११०॥
जैसे पतिव्रतेच्या मनी । दुसरा नसेचि कोणी पतिवाचुनी । तैसे मजसी सर्वस्व मानुनी । जमले येथे ॥१११॥
मज विजयाची इच्छा करून । जीव टाकण्या ओवाळून । आले सिद्ध होऊन । रणांगणी ॥११२॥
युद्ध कलेत निपुण । रण कौशल्याची नाही वाण । सवे क्षत्रियांचा अभिमान । तयांचे मनी ॥११३॥
ऐसे माझे जे शूरवीर । युद्धास असती जे तयार । कीर्ती जयांची अपार । जमले येथे ॥११४॥
क्षत्रियामाजी जे श्रेष्ठ । युद्धकलेत जे वरिष्ठ । करतील पांडवांना नष्ट । भीष्म पहा ॥११५॥
सुंदर व्यूव्हरचना रचून । युद्धास तयार होऊन । त्रैलौक्यही भासते लहान । या सैन्यापुढे ॥११६॥
आधीच समुद्र अपार । त्यात समुद्रअग्नी तयार । आता प्रलय महाभयंकर । होईल येथे ॥११७॥
प्रलय अग्नीसह झंझावात । दोघांचा जैसा संघात । तैसे भीष्म हे गंगासुत । सेनापती ॥११८॥
आता यांना कोण भिडेल । पहा पांडव हरतील । माझाच विजय होईल । रणांगणी ॥११९॥
दांडगा भीम पांडव सेनापती । न जाणे तो युद्धनीती । होईल पांडवांची दुर्गती । या युद्धात ॥१२०॥
मग पुन्हा तो म्हणाला । सर्व त्या सैन्यदलाला । सज्ज व्हा युद्धाला । आता येथे ॥१२१॥
आपल्या ज्या पलटणी । तयात सामील होऊनी । करावी सैन्याची आखणी । महारथींनी आता ॥१२२॥
महारथींनी सैन्य सांभाळावे । भीष्मांच्या आज्ञेत रहावे । म्हणे द्रोणास ठेवावे । लक्ष सर्वांवर ॥१२३॥
भीष्मांचे संरक्षण करावे । अतिदक्ष रहावे । भीष्मास दुर्योधनच समजावे । सकल तुम्ही ॥१२४॥

संजय उवाच

राजाचे हे बोल ऐकून । गेले सेनापती आनंदून । सिंहनाद मग करून । तयार झाले ॥१२५॥
आवाज भयंकर झाला । प्रतिध्वनी आकाशी उमटला । युद्धक्षेत्री नच सामावला । तो ध्वनी ॥१२६॥
मग त्या क्षणी । वीरवृत्ती ती उपजोनी । भीष्मांनी केला शंखध्वनी । आवेशात ॥१२७॥
ते दोन्ही नाद मिसळले । त्रैलोक्य बधिर झाले । जैसे आकाशच पडले । तुटोनिया ॥१२८॥
धडधड झाली आकाशात । लाटा उठल्या सागरात । चराचर झाले कंपित । ऐकता ध्वनी ॥१२९॥
ऐशा महाघोषात । आवाज दुमदुमले गिरीकंदरात । रणवाद्याच्या आवाजात । सिद्ध सारे ॥१३०॥
वाद्यांचा ध्वनी जाहला । जसा प्रलयकाल प्रकटला । पोटात गोळाच उठला । वीरांच्याही ॥१३१॥



ई-साहित्य प्रतिष्ठान
For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

शंख ढोल रणभेरी । नौबत झांजा तुतारी । वाद्ये वाजता ती सारी । गडगडाट झाला ॥१३२॥
आवेशाने भुजा थोपटती । शत्रुपक्षास आव्हान देती । जसे मदोन्मत हत्ती । आवरती ना ॥१३३॥
भित्र्यांना विचारते कोण । गेले कस्पटासमान उडून । भयंकर आवाजानं । यमही घाबरला ॥१३४॥
काही उभ्यानेच मेले । कोणी दातखिळी बैसले । वीरांनाही कापरे भरले । ऐकता ध्वनी ॥१३५॥
भयंकर रण ध्वनी जाहला । ब्रह्मदेवही व्याकुळला । पाहून त्या प्रलयकाला । देवही घाबरले ॥१३६॥
स्वर्गात पसरली घबराट । पाहून तो आकांत । इकडे काय झाले पांडवसेनेत । पाहू आता ॥१३७॥
जया निशाण विजयाचे । चिन्ह जे पराक्रमाचे । घोडे गरुडाच्या जातीचे । तो रथ अर्जुनाचा ॥१३८॥
मेरू पर्वतास पंख फुटणे । तैसे ते रथाचे उधळणे । सर्व दिशांचेही उजळणे । रथाकारणे ॥१३९॥
ज्या रथाचा सारथी कृष्ण । जो वैकुंठीचा राणा जाण । त्या रथाचे गुणवर्णन । काय करू ॥१४०॥
हनुमान असे ध्वजस्तंभावर । जो शंकराचा अवतार । आणि सारथी सारंगधर । अर्जुनप्रेमी ॥१४१॥
पहा नवल परमेश्वराचे । किती प्रेम तया भक्ताचे । सारथ्य करी अर्जुनाचे । स्वये परमेश्वर ॥१४२॥
भक्तासी पाठीसी घातला । आपण पुढे राहिला । शंख पांचजन्य वाजवला । भगवंताने ॥१४३॥
पहा महाघोष झाला । तैसा शंख निनादला । जैसा महासूर्यच उगवला । लोपवून नक्षत्रा ॥१४४॥
वाद्यांचे आवाज ते । कौरव सैन्यात जे गाजत होते । गेले सहज लोपून ते । या आवाजी ॥१४५॥
ऐसा आवाज ऐकून । मग स्फुरण ते चढून । शंख देवदत्त अर्जुनानं । वाजविला रणी ॥१४६॥
ध्वनी दोन शंखांचा मिसळून । आवाज भयंकर होऊन । ब्रह्मांडही भासे विदीर्ण । रणांगणी ॥१४७॥
भीमास आवेश चढला । जसा प्रलयकाल खवळला । शंख पौण्ड्र वाजविला । भीमाने पहा ॥१४८॥
गडगडाट जसा ढगांचा । तसा आवाज शंखांचा । शंखही युधिष्ठिराचा । वाजला रणी ॥१४९॥
शंख सुघोष नकुलाने । आणि मणिपुष्पक सहदेवाने । एकत्रित त्या ध्वनीने । घाबरला यम ॥१५०॥
तेथे राजे असती अनेक । द्रुपद द्रौपदेयादिक । तो काशी नरेश तू देख । महाबाहू ॥१५१॥
अभिमन्यू अर्जुनाचा सुत । सात्यकी तो अपराजित । आहे धृष्टद्युम्न नृपनाथ । शिखंडीसह ॥१५२॥
विराट आणि राजे इतर । सेनापती जे मुख्य वीर । ते शंख वाजवून तयार । युद्धासाठी ॥१५३॥
भयंकर आवाज ऐकुनी । शेष कूर्म गेले घाबरूनी । मस्तकावरील भूभार टाकुनी । पळू पाहती ॥१५४॥
तिन्ही लोक डळमळले । मेरू मांदार हलू लागले । समुद्रजल ते उसळले । कैलासामाजी ॥१५५॥
तेथे भूमीच उलटू पाहे । आकाश कोसळू जाये । सडा नक्षत्रांचा पडू पाहे । त्या रणांगणी ॥१५६॥
प्रलय झाला रे झाला । देवांचा आधार गेला । एकच गोंधळ उडाला । सत्यलोकी ॥१५७॥
दिवसा सूर्य बुडाला । ऐसा प्रलयकाल मांडला । भयंकर हाहाकार झाला । तिन्ही लोकी ॥१५८॥
ते पाहून वाटले कृष्णाला । हा प्रलयकाल आला । पण गडगडाट थांबला । एकाएकी ॥१५९॥
बरे झाले जग ते वाचले । एरवी जग होते संपले । शंख जेव्हा वाजवले । सर्वांनी ॥१६०॥
आवाज जरी ओसरला । प्रतिध्वनी उमटत राहिला । तेणे दळभार विध्वंसला । कौरवांचा ॥१६१॥
सिंह घुसून हत्ती कळपात । लावे तयांची वाट । तैसे झाले भयभीत । कौरव तेथे ॥१६२॥
तो आवाज ऐकून । गलितगात्र झाले सैन्य । म्हणती एकमेका घाबरून । सावध रे सावध ॥१६३॥
तेथे जे धाडसी होते । महारथी वीर ते । तयांनी आपल्या सैन्यांते । धीर दिधला ॥१६४॥
सैन्य उत्साहाने उठले । दुप्पट जोमाने सरसावले । लोक भयभीत झाले । तिन्ही तेव्हा ॥१६५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसे सोडले धनुर्धरांनी बाण । जैसे मुसळधार पर्जन्य । आले जसे तुफान । प्रलयकाळी ॥१६६॥
पाहून त्या बाणवृष्टीस । संतोष अर्जुनाच्या मनास । पाहिले तयाने सैन्यास । टाकूनी दृष्टी ॥१६७॥
युद्ध सज्ज पाहून तयांना । सकळ त्या कौरवांना । अर्जुन उचलून धनुष्यबाणा । सज्ज जाहला ॥१६८॥
तेंव्हा अर्जुन तो म्हणाला । भगवान श्रीकृष्णाला । घेऊन चल रथाला । मध्यभागी ॥१६९॥
पाहू दे मजला क्षणभर । सकल सैनिकवीर । जयासवे मी झुंजणार । आज येथे ॥१७०॥
कोणासंगे मज झुंजायचे । मला आहे पहायचे । निमित्त करुन युद्धाचे । आले कोण ॥१७१॥
ऐसे हे सगळे कौरव । वाईट तयांचा स्वभाव । राज्यलोभाची घेऊन हाव । आले रणी ॥१७२॥
कौरवा अंगी नसे योग्यता । परि ही युद्धसज्जता । नसल्याने अंगी धीरता । मरतील ते ॥१७३॥
इतके अर्जुन तो बोलला । मग श्रीकृष्णाने रथ नेला । दोन्ही सैन्यात उभा केला । मध्यभागी ॥१७४॥
होते तेथे भीष्म द्रोणादिक । जयासी अर्जुनाची जवळीक । राजे महाराजे अनेक । होते तेथे ॥१७५॥
तेथे स्थिर करुनिया रथ । अर्जुनाने तयांना न्याहाळत । पाहिले सैन्य समस्त । गंभीरपणे ॥१७६॥
म्हणे बघ बघ श्रीकृष्णा । माझ्या सकल आप्तजनां । ते ऐकून श्रीकृष्णा । विस्मय जाहला ॥१७७॥
श्रीकृष्ण मनात म्हणाला । काय जाहले अर्जुनाला । असा कसा हा बिथरला । आज रणांगणी ॥१७८॥
पुढील भविष्य जाणून । मन शांत ठेवून । धारण केले मग मौन । भगवंताने ॥१७९॥
तेथे अर्जुनाने पाहिले । चुलते मामे आपले । पित्यासम भीष्म भले । उभे रणांगणी ॥१८०॥
देखिले मित्र आपले । पुत्रादिकांनाही पाहिले । सकळ आप्तजन दिसले । त्याला रणांगणी ॥१८१॥
सुहृदय ते सासरे । आणिक सगे सोयरे । पुत्र पौत्र धनुर्धरे । देखिले तेथे ॥१८२॥
जयावर उपकार होते केले । संकटी जयांना रक्षिले । ते नातेवाईक आपले । पाहिले त्याने ॥१८३॥
आप्तजन दोन्ही सैन्यात । प्रवृत्त होऊन युद्धात । उपस्थित जे रणांगणात । पाहिले तयांना ॥१८४॥
पावून त्या ममत्वभावाला । अर्जुन मनी गोंधळला । प्राप्त होता करुणेला । संपली वीरवृत्ती ॥१८५॥
स्त्रिया ज्या कुलीन असती । सुंदर आणि लावण्यवती । दुसरी स्त्री सहन न करती । कुलीन स्त्रिया ॥१८६॥
नवी प्रेयसी भेटणे । आपल्या धर्मपत्नीस विसरणे । मग औचित्य ते सोडणे । भ्रष्ट होऊन ॥१८७॥
सिद्धी भेटता तपाकारणे । मनबुद्धीचे भ्रष्ट होणे । मग विरक्ती विसरणे । सिद्धीसाठी ॥१८८॥
तैसे अर्जुनास झाले । त्याचे पुरुषत्वच गेले । जेव्हा कारुण्य ते प्रकटले । त्याचे मनी ॥१८९॥
जशा त्या मांत्रिकाला । जो उच्चारात चुकला । मग भूतच बिलगे मांत्रिकाला । आपोआप ॥१९०॥
तसा अर्जुनाचा धीर गेला । ह्रदयी तो द्रवला । जसा सोमकांत मणी पाझरला । चंद्रकिरणांनी ॥१९१॥
तसा तो अर्जुन । ममतेने संमोहित होऊन । खिन्न होऊन अंत:करण । बोलला भगवंता ॥१९२॥
अर्जुन म्हणे पहा देवा । माझ्या बांधवाचा मेळावा । आप्त परिवार आघवा । जमला तेथे ॥१९३॥
सर्वांचे युद्ध प्रवृत्त होणे । नी रणांगणी जमणे । स्वजनांशी युद्ध करणे । अनुचित ते ॥१९४॥
आता मज नच सुचे काही । माझे मज भान नाही । मन बुद्धी स्थिर नाही । पहा माझी ॥१९५॥
कोरड पडली मुखाला । गात्रे अनुभवती दुर्बलतेला । कंप सुटला शरीराला । नि रोमांच उठले ॥१९६॥
सर्वांगा काटे आले । आणि मन विषण्ण जाहले । बघ हात लुळे पडले । गांडीव धरिता ॥१९७॥
धनुष्य पहा निसटले । हातातून गळून पडले । ऐसे ह्रदय व्यापिले । मोहाने माझे ॥१९८॥
वज्राहूनही कठीण । खंबीर माझे मन । परि त्याहूनही बलवान । हा मोह ॥१९९॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com
ई साहित्य प्रतिष्ठान

जयाने शंकराही जिंकले । निवातकवचा नष्ट केले । त्या अर्जुनासी मोहाने धरीले । पहा देवा ॥२००॥
पहा भुंग्याची ती जात । लाकडा सहज असे छेदीत । परी अडके कलिकेत । कोवळ्या त्या ॥२०१॥
गुदमरुन असे तो मरत । परि पाकळीस नसे चिरत । ऐसा होत असे मोहित । मधाकारणे ॥२०२॥
पहा आदिपुरुषाची माया । ब्रह्मदेवही असमर्थ जाणावया । भुली पाडले अर्जुनास या । संजय म्हणे ॥२०३॥
ऐसा तो अर्जुन । देखोनी सकल आप्तजन । विसरला लढाऊपण । स्वत:चे ॥२०४॥
कैसे हळवेपण उपजले । चित्त सैरभैर झाले । मग कृष्णास म्हटले । जातो आता ॥२०५॥
अतिव्याकूळ माझे मन । बोबडी गेली वळून । मारणे आप्तजन । पाप देवा ॥२०६॥
या कौरवा कां मारावे । धर्म भीमा का सोडावे । हे सगळेच आघवे । आप्त माझे ॥२०७॥
आग लागो या युद्धाला । युद्ध न पटे मजला । प्राप्त होईन पापाला । युद्ध करता ॥२०८॥
म्हणे देवा विचार करता । युद्ध करणे अनिष्टता । युद्ध हे टाळता । कल्याण माझे ॥२०९॥
मज युद्ध इच्छा नाही । राज्य लोभ न मज ठायी । ठार मारू हे आततायी । कशासाठी ॥२१०॥
या सर्वांना मारावे । नि राज्य भोग भोगावे । जळो ते सुख आघवे । पार्थ म्हणे ॥२११॥
त्रैलोक्यही नको मजला । काय करू या पृथ्वीला । न मारीन त्या सर्वाला । मेलो तरी बेहत्तर ॥२१२॥
आप्तजनांसी वधावे । मग राज्यसुख भोगावे । पाप ते आघवे । पहा देवा ॥२१३॥
कशासाठी जन्म घेणे । कोणासाठी ते जगणे । आप्तजनां मारणे । अकल्याणकारी ॥२१४॥
कुलास इच्छा पुत्राची । फळ तयाचे काय हेचि । हत्या करणे गोत्रांची । पाप देवा ॥२१५॥
हे मनी कसे आणावे । आपण वज्राहून कठीण व्हावे । स्वजनांचे हिता चिंतावे । ते कल्याणप्रद ॥२१६॥
आम्ही जे जे मिळवावे । ते स्वजनांनीच भोगावे । त्यासाठी प्राणही अर्पावे । ते कर्तव्य माझे ॥२१७॥
आम्ही पृथ्वीचे भूपाळ । जिंकून ते राजे सकळ । आम्ही संतोषावे कुळ । आपुले जे ॥२१८॥
ते माझे आप्त समस्त । युद्धास होऊन प्रवृत्त । कर्म करण्या विपरीत । आले येथे ॥२१९॥
सोडोनी स्त्रिया संतान । सांडोनी धन प्राण । शस्त्रे घेऊन आप्तजन । आले येथे ॥२२०॥
यासी मी कैसा मारू । कोणावर नेम धरू । निज हृदया करू । आघात कैसा ॥२२१॥
जाणतोस तू हे कोण । पहा भीष्म आणि द्रोण । जयांचे उपकार असाधारण । आम्हावरी ॥२२२॥
काके मामे सासरे । शालक बंधू सारे । पुत्र पौत्रादिक पहा रे । आले येथे ॥२२३॥
हे अति जवळचे । सगेसोयरे आमचे । पाप लागेल ते साचे । तयासी मारता ॥२२४॥
ते काहीही करोत । मज ठारही मारोत । परि करणे तयाचा घात । अयोग्य देवा ॥२२५॥
त्रैलोक्यचेही समस्त । जरी राज्य होईल प्राप्त । मारणे कौरवांना अनुचित । आहे देवा ॥२२६॥
जर यांसी मी मारील । अपकीर्ती ती होईल । मग बदनामी ती चिरकाल । माझी देवा ॥२२७॥
जर वध करेल यांचा । डोंगर घडेल पापांचा । सखा तू माझ्या हक्काचा । जाशील दुरी ॥२२८॥
कुलहत्या ती करता । पाप अंगी लागता । तुज ईश्वरासी अंतरता । सुख कोठे ॥२२९॥
आग लागली उद्यानाला । त्यात जोर चढला हवेला । मग पहा ती कोकिला । उडून जाई ॥२३०॥
चिखलयुक्त सरोवर । पाहुनी ते चकोर । मग उडून जाती दूरवर । शोधण्या पाणी ॥२३१॥
देवा ते तैसे होईल । तू मज सोडून जाशील । पुण्य जर ते संपेल । माझे देवा ॥२३२॥
म्हणून मी हे न करी । युद्धी शस्त्र न धरी । युद्ध ते अकल्याणकारी । दिसे मजला ॥२३३॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com
ई साहित्य प्रतिष्ठान

तुजसी अंतरता । काय ती उपयोगिता । मग दु:खाचीच वार्ता । माझ्या जीवनी ॥२३४॥
म्हणून कौरवा मारावे । मग भोग ते भोगावे । कधीच न ते घडावे । ऐसे कर्म ॥२३५॥
ते लोभास भुलले । आणि युद्धासी ठाकले । परि हित आम्ही आपुले । सांडू नये ॥२३६॥
हे ऐसे कैसे करावे । सगेसोयरे ते मारावे । माहीत असूनही सेवावे । विष जैसे ॥२३७॥
जंगलातून ते जाणे । सिंहाचे सामोरे येणे । मग तयासी चुकवणे । लाभदायी ॥२३८॥
दिवा तो विझवावा । आणि अंधाराचा आश्रय घ्यावा । ते लाभप्रद कां देवा । सांग मजला ॥२३९॥
समोर अग्नी देखोनी । जर न गेलो तया टाळूनी । मग तो टाकी जाळूनी । क्षणार्धात ॥२४०॥
युद्ध पाप मूर्त । अंगी बिलगु असे पाहात । सांग का युद्धप्रवृत्त । व्हावे आम्ही ॥२४१॥
अर्जुन म्हणाला तेधवा । ध्यानी घ्यावे तुम्ही देवा । पापाचा हा कावा । ओळखला मी ॥२४२॥
लाकडावर लाकूड घासता । ठिणगी ती प्रकटता । मग वणवा तो पसरता । जळे अरण्य ॥२४३॥
तैसे भाऊबंद आपसात । लढले जर मत्सरात । मग त्या युद्धात । नाश कुळाचा ॥२४४॥
ऐशा या पापाने । घडे नीतिमत्तेचे लोपणे । मग कुलधर्माचे संपणे । आपोआप ॥२४५॥
सारासार विचार संपता । अविचार तो आचरता । अनीतीची मग सत्ता । सर्वदूर ॥२४६॥
प्रकाशित दिवा मालवणे । अंधारी ते रहाणे । मग घडेच अडखळणे । आपोआप ॥२४७॥
तैसे नीतिमत्ता ती जाता । अधर्म तो आचरता । वाढता ती भ्रष्टता । पाप घडे ॥२४८॥
यमनियम सांडता । इंद्रिये सैर होता । मग घडे व्यभिचारीता । कुलस्त्रियांठायी ॥२४९॥
चांगल्या वाईटाचा संकर होता । उत्तम अधम एकत्र येता । धर्माचरण संपता । संपे धर्म ॥२५०॥
जैसे बळी ठेवता चव्हाट्यावरती । कावळे ते झडप घालती । तैसी पापे प्रवेशती । त्या कुळी ॥२५१॥
मग संपूर्ण त्या कुळाला । आणि त्या कुळ घातक्याला । जाणे घडे नरकाला । आपोआप ॥२५२॥
मग वंशवेल होऊन दूषित । पितर पतन पावतात । दुर्गती मग प्राप्त । त्या पितरांना ॥२५३॥
जेथे नित्यकर्म थांबते । आणि नैमित्तिक संपते । मग करावे श्राद्ध ते । कोणाचे कोणी ॥२५४॥
मग पितर काय करती । जे स्वर्गीचे स्थान गमावती । पुन्हा कुळी जन्म घेती । वारंवार ॥२५५॥
लागता सर्प विष नखाग्री ते । मस्तकी पटकन चढते । तैसे सारे कुल बुडते । संपता धर्म ॥२५६॥
देवा ऐका तुम्ही आणिक । तेथे घडे महापातक । पतित होती लोक । संगतीकारणे ॥२५७॥
जैसे आपल्या घरात । आग लागता अकस्मात । असे मग जळत । शेजारही ॥२५८॥
तैसे भ्रष्टांच्या संगतीत । लोक जे येतात । तेही भ्रष्ट होतात । आपोआप ॥२५९॥
अर्जुन म्हणे ते कुळ । युक्त नाना दोष सकळ । मग नरक निरय केवळ । त्यांच्या नशिबी ॥२६०॥
निरय नरकी जे पडती । न सुटती ते कल्पांती । ऐसी होतसे गती । कुलक्षय होता ॥२६१॥
देवा इतके मी सांगितले । परि तुवा कारुण्य न उपजले । काय हृदय वज्राचेच केले । आता तुम्ही ॥२६२॥
ज्यासाठी राज्यसुख अपेक्षावे । ते शरीर क्षणिक आघवे । तरीही का न त्यजावे । पाप आम्ही ॥२६३॥
जे वडील सकळ आपुले । खुनी दृष्टीने म्यां पाहिले । पाप का लहान घडले । माझे ठायी ॥२६४॥
वडीलधाऱ्यांचा वध करून । कां रहावे जिवंत आपण । त्यापेक्षा शस्त्र ते टाकून । मरेन मी ॥२६५॥
मेलो तरी उत्तम । परि पाप न करीन अधम । झालो जरी मी खतम । आज येथे ॥२६६॥
ऐसे देखोनी सकळ । अर्जुनाने आपुले कुळ । म्हणे युद्ध ते केवळ । नरकवास ॥२६७॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

मग त्या वेळेला । अर्जुन काय बोलला । संजय म्हणे धृतराष्ट्राला । ऐका आता ॥२६८॥
अर्जुना उद्वेग आला । तो अत्यंत गहिवरला । मग पहा तो उतरला । रथाखाली ॥२६९॥
जैसा राजपुत्र पदच्युत । होत असे अपमानित । वा सूर्य राहूग्रस्त । तेजहीन ॥२७०॥
सिद्धीसाठी तप करणे । मग भ्रमिष्ट ते होणे । ऐसे कामना कारणे । ते दीनवाणी ॥२७१॥
तैसा तो धनुर्धर । होऊन दु:खाने जर्जर । रथातून पहा पायउतार । झाला असे ॥२७२॥
मग धनुष्यबाण टाकला । अर्जुना अश्रुपात झाला । ऐसा प्रकार तो घडला । म्हणे संजय ॥२७३॥
आता यावरी तो वैकुंठनाथ । देखोनी दु:खी पार्थ । पहा अति सुंदर परमार्थ । सांगेल आता ॥२७४॥
ती सविस्तर पुढील कथा । कौतुक होईल ऐकतां । ज्ञानदेव म्हणे आता । ऐकाल तुम्ही ॥२७५॥

ॐतत्सदिति श्रीमद्‌भगवद्‌गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे अर्जुनविषादयोगोनाम प्रथमोऽध्याय: ॥१॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

साहित्य प्रतिष्ठान

# ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट। वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु ह्रदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

---

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

---

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

---

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे हृदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com
ई साहित्य प्रतिष्ठान®
www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळयांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९९६७४८२०